लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# ६८५ हेक्टर खारफुटीची जमीन अद्याप सिडकोच्याच ताब्यात

## आदेशानंतरही वनविभागाला जागा हस्तांतरित न केल्याबाबत न्यायालयाकडून नाराजी

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** खारफुटीची जमीन संरक्षित करण्याच्या दृष्टीने ती वनविभागाकडे हस्तांतरित करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने सर्व सरकारी प्राधिकरणांना दिले होते. मात्र, वारंवार आदेश देऊनही शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाने (सिडको) त्यांच्या हद्दीत येणारी ६८५ हेक्टर खारफुटींची जमीन अद्याप वनविभागाकडे हस्तांतरित केलेली नसल्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी नाराजी व्यक्त केली. तसेच चार आठवड्यांत खारफुटीच्या जमिनीचे सर्वेक्षण आणि प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले.

आदेशाचे पालन न केल्यास महसूल व वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना न्यायालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले जातील असा इशारा न्यायालयाने सोमवारी दिला. राज्यातील सर्व खारफुटींच्या रक्षणासाठी ती वनविभागाच्या ताब्यात देण्याचे आदेश द्या, अशी मागणी 'वनशक्ती' या संस्थेने जनहित याचिकेद्वारे केली आहे. या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी मुख्य न्यायाधीश न्या. देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला वरीलप्रमाणे आदेश दिले.



### सर्वेक्षणासाठी चार आठवड्यांची मुदत

खारफुटीच्या जमिनीचे सर्वेक्षण सुरू असून ते पूर्ण होण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे, त्यासाठी दोन महिन्यांची मुदत द्यावी, अशी मागणी अतिरिक्त सरकारी वकील मनीष पाबळे यांनी न्यायालयाकडे केली. त्याला याचिकाकर्त्यांतर्फे विरोध करण्यात आला. तसेच, खारफुटीच्या जमिनीचे ड्रोनच्या साहाय्याने सर्वेक्षण करणे सहज शक्य आहे आणि त्यासाठी दोन महिन्यांची गरज नाही, असेही त्यांनी सांगितले. न्यायालयाने सरकारच्या मागणीबाबत आश्चर्य व्यक्त केले. तसेच, हे काम चार आठवड्यांत पूर्ण करण्याचे सरकारला बजावले.

**सिडकोकडून न्यायालयीन आदेशाकडे दुर्लक्ष**

महाराष्ट्रात ३२ हजार हेक्टर जमिनीवर खारफुटीचे आच्छादन आहे. त्यापैकी १६ हजार ९८४ हेक्टर जमीन ही केंद्रीय वन अधिनियमांतर्गत कायदेशीर जंगल म्हणून संरक्षित करण्यात आली आहे. तसेच, कोणत्याही गैर-वनीकरण उद्देशासाठी या जागेचा वापर करायचा असल्यास संबंधित विभागाकडून त्यासाठी परवानगी घेणे कायद्याने बंधनकारक आहे. विविध सरकारी प्राधिकरणांसह खासगी व्यक्ती, कंपन्यांच्या अखत्यारीत असलेली खारफुटीची जमीन संरक्षित करण्याच्या दृष्टीने वनविभागाकडे हस्तांतरित करण्याचे आदेश न्यायालयाने यापूर्वी दिले होते.

सिडको वगळता अन्य प्रतिवादींनी या आदेशाचे पालन केले आहे ही बाब याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील झमन अली यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. सिडकोच्या अखत्यारीत ६८५ हेक्टर खारफुटीची जमीन असून ती अद्याप वनविभागाकडे हस्तांतरित केलेली नाही, असेही अली यांनी न्यायालयाला सांगितले.